व्ही. पी. एस. ई. एम. एस

# विद्या प्रतिष्ठानचे,

# सोमेश्वर इंग्लिश मिडीयम स्कूल व ज्युनि. कॉलेज, सी.बी.एस.ई.

वाघळवाडी–सोमेश्वरनगर, ता.बारामती, जि.पुणे. 412 306, फोन नं. 02112 – 283306

ई.मेल – vpsems@vidyapratishthan.com ; वेब साईट : www.vpsomeshwar.org

**मुख्याध्यापक : श्री.सचिन पाठक. (एम.ए.बी.एड.)** **सी. बी .एस.ई मान्यता कमांक :1130817**


SCHOOL DISE NO

2 7 2 5 0 2 0 7 6 1 0

नप्राशि/२००८-०९/इंग्रजी/मान्यता/ड ५१२(ब)/३७५८ दि. ८/ १७/ २००८

जा.क्र/३०८/ २०२३-२४

दिनांक: ०६/११/२०२३

प्रति,

**मा. शिक्षणाधिकारी, (प्राथमिक)**

पुणे जिल्हा परिषद, जि. पुणे.

**विषय : नमुना २ साठी छायांकित प्रतीचा स्विकार करणेबाबत...**

महोदय,

वरील संदर्भीय विषयानुसार विद्या प्रतिष्ठान सोमेश्वर इंग्लिश मिडीयम स्कूल, सी.बी.एस.ई. वाघळवाडी– सोमेश्वरनगर या शाळेचा शैक्षणिक वर्ष २०१९ ते २२ व २०२२ ते २५ साठी बालकांच्या मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ यांच्या कलम १८ च्या प्रयोजनार्थ, बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम, २०११ यांचा नियम ११, पोट नियम (४) अन्वये शाळा स्व–मान्यता (नमुना २) साठी आपल्या ई मान्यता प्रणाली मार्फत सदरचा प्रस्ताव दाखल करीत असून सदर मान्यता साठी लागणारी कागद प्रत्रे हि छांयाकित प्रती मध्ये अपलोड करीत आहे.

सदर प्रस्तावासोबत जोडलेले सर्व कादगपत्रे हे वैध मार्गाने मिळवलेले आहेत व सर्व कागदपत्रे सत्य आहेत याची मी हमी देतो. सदरील शाळा अथवा संस्था हि कोणतीही अनधिकृत शाळा अथवा वर्ग चालवीत नाही. ही शाळा किंवा संस्था सर्व शासकीय नियमाचे पालन हे जबाबदारीपूर्वक करीत आहे. शाळा मान्यता अथवा संस्था व्यवस्थापन यांचे संदर्भात न्यायप्रविष्ट बाब नाही याचीही मी हमी देत आहे. भविष्यात या संदर्भात विसंगती अथवा चुकीची व खोटी कागदपत्रे दिल्याचे निदर्शनास आल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी मुख्याध्यापक म्हणून माझी व संस्थेची राहील याची मला जाणीव आहे व होणाऱ्या कायदेशीर परिणामास मी जबाबदार राहीन.

सदर कागदपत्रांची मूळप्रत मिळत नसल्यामुळे किंवा नजर चूकीने गहाळ झाल्या कारणांस्तव ही सत्यप्रत जोडत आहे तरी याचा स्वीकार व्हावा हि विनंती.

कळावे.

आपला विश्वासू,

मुख्याध्यापक

विद्या प्रतिष्ठानचे

सोमेश्वर इंग्लिश मिडियम स्कूल

वाघळवाडी–सोमेश्वरनगर,ता.बारामती,जि.पुणे ४१२ ३०

V.P.'s Someshwar English Medium School, Someshwar, Tal. Baramati

कायम विना अनुदान तत्वावर ( इंग्रजीमाध्यम )

Vidya Pratishthan's
Someshwar English Medium School,Someshwar
Inward No. 159
Date 24/08/2010

पुणे जिल्हा परीषद, पुणे
यशवंतराव चव्हाण भवन,
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र.जि.प./शिक्षण/प्राथ./२/
/खा.प्रा.शा./८०/ ~~दि.२/२०१०~~
दि० २४/८/२०१०

प्रति,
मुख्याध्यापक,/मुख्याध्यापिका,
विद्या प्रतिष्ठानचे
सोमेश्वर इंग्लिश मिडियम स्कूल, बारामती

विषय :- कायम विना अनुदान तत्वावरील शासन मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना जादा/नैसर्गिक वाढीचा/वाढीच्या प्राथम /जादा तुकडया/वर्ग उघडण्यास परवानगी देणेबाबत...

संदर्भ :- शासन निर्णय क्रमांक-व्ही.एल.एस.-२००२/ (२०००/०२) प्रा.शि.-३ दिनांक १४ जाने.२००३.

वरील विषयासंबंधींचा आपणाकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता खाली नमुद केलेल्या शाळेस त्यांच्या नावासमोर दर्शविण्यात आलेल्या जादा / नैसर्गिक वाढीचा / वाढीच्या प्रथम/ जादा तुकडया / वर्ग जून २०१० पासून सन २०१० - २०११ या शैक्षणिक वर्षापासून खाली दर्शविण्यात आलेल्या अटींच्या आधीन राहून मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | शाळेचे नांव | माध्यम | इयत्ता | तुकडीवाढ जादा/नैसर्गिक | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १) | विद्या प्रतिष्ठानचे सोमेश्वर इंग्लिश मिडियम स्कूल, बारामती | इंग्रजी | इ.२री ते ७वी | नैसर्गिक | मंजूर |

**अटी व शर्ती**

१. शाळेस शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा व आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तीच्या आधीन राहून नेमला पाहिजे.
२. सदर शाळेने तुकडयासाठी सर्व भौतिक सुविधा तसेच शैक्षणिक व्यवस्थापनविषयक सुविधा उपलब्ध करुन नेमला पाहिजे.
३. सदर शाळेस स्वच्छतागृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असावयास हवी.
४. शाळेने शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे.
५. सदर मंजूर करण्यात येणा-या तुकडीमुळे परीसरातील इतर मान्यता प्राप्त प्राथमिक शाळेच्या पटावर विपरीत परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.
६. सदर शाळेच्या वर्गास / तुकडीस विद्यार्थीसंख्या पुरेशी असणे आवश्यक आहे.
७. तपासणीअंती एकजरी अट नियमबाह्य निदर्शनास आल्यास तुकडी / वर्ग मान्यता रद्द करण्यात येईल.
८. पट व उपस्थिती वाढविण्याच्या अटीवर सदर मान्यता देण्यात येत आहे.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
पुणे जिल्हा परीषद,पुणे

प्रत :माहितीसाठी व योग्य कार्यवाहीसाठी रवाना.
१. सचिव / अध्यक्ष, विद्या प्रतिष्ठान बारामती

मुख्याध्यापक
विद्या प्रतिष्ठानचे
सोमेश्वर इंग्लिश मिडियम स्कूल
वाघळवाडी-सोमेश्वरनगर,ता.बारामती,जि.पुणे ४१२ ३०

TRUE COPY

महाराष्ट्र शासन

शासन परवानगी आदेश

क्रमांक- इंमाशा -२०११/(८५/११)/माशि-१,
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२,
दिनांक:- १५/९ / २०११.

प्रति,

अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
शिवाजीनगर, पुणे.

**विषय :-** इंग्रजी माध्यमाच्या इ. ७ वीपर्यंत सुरु असलेल्या प्राथमिक शाळेस जोडून इ. ८ वी ते इ. १० वी चे इंग्रजी माध्यमाचे वर्ग कायम विनाअनुदान तत्वावर सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत.

**संदर्भ :-** १) शासन निर्णय, क्र. नमाशा २०१०/(९६/२०१०) /माशि-१, दि.१०.३.२०१०.
२) संस्थेचा दि.१८/७/२०११ रोजीचा अर्ज व सर्व संबेधित कागदपत्रे.

सोबत जोडलेल्या संस्थेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की विद्या प्रतिष्ठान, विद्यानगरी, भिगवण रोड, बारामती, जि.पुणे या संस्थेद्वारे संचलित इंग्रजी माध्यमाच्या इ. ७ वीपर्यंत सुरु असलेल्या **सोमेश्वर इंग्लिश मिडीयम स्कूल, सोमेश्वरनगर, ता.बारामती, जि.पुणे** येथील प्राथमिक शाळेस जोडून इंग्रजी माध्यमाचे इ. ८ वी ते इ. १० वीचे वर्ग कायम विनाअनुदान तत्वावर सुरु करण्यास शासन स्तरावरुन पुढील अटी व शर्तींच्या अधीन राहून परवानगी देण्यात येत आहे :-

१) परवानगी आदेशाच्या दिनांकापासून एक वर्षाच्या आत संस्थेने राज्यमंडळाकडे संलग्नता प्रमाणपत्रा करिता (प्रथम प्रोव्हीजनल व नंतर रेग्युलर) अर्ज करणे आवश्यक राहील.
२) सदर परवानगी आदेश राज्य मंडळातर्फे दिल्या जाणाऱ्या संलग्नता प्रमाणपत्राकरिता (रेग्युलर ॲफीलीएशन) आवश्यक असणाऱ्या सर्व निकषांची पूर्तता करण्याच्या अधीन राहतील.
३) राज्य मंडळाने संलग्नता प्रमाणपत्राकरिता(रेग्युलर ॲफीलीएशन)निश्चित केलेल्या निकषांची पूर्तता न केल्यास सदर परवानगी आदेश रद्द समजण्यात येतील.
४) परवानगी दिलेल्या ठिकाणावरुन सदर शाळेचे स्थलांतर करण्यास परवानगी दिली जाणार नाही.
५) संबंधित शाळेने शासन, शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), पुणे व राज्य मंडळ यांच्यातर्फे निर्गमित केल्या जाणाऱ्या सर्व आदेशांचे पालन करणे बंधनकारक राहील.
६) परवानगी देण्यात आलेल्या इ. ८ ते १० वीच्या वर्गांमध्ये महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने निर्धारित केलेला अभ्यासक्रम शिकविणे आवश्यक राहील.
७) परवानगी आदेशाच्यावेळी शाळेत सुरु असलेल्या सर्व वर्गांना या आदेशाद्वारे परवानगी देण्यात येत आहे.

(रा. चं. पाटील)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत- माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी-
शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), पुणे
मा.मंत्री (शाशि) यांचे खाजगी सचिव /मा.राज्यमंत्री (शाशि) यांचे खाजगी सचिव
विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे / शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प.पुणे
सचिव, विद्या प्रतिष्ठान, विद्यानगरी, भिगवण रोड, बारामती, जि.पुणे
निवड नस्ती, माशि-१

मुख्याध्यापक
विद्या प्रतिष्ठानचे
सोमेश्वर इंग्लिश मिडियम स्कूल
वाघळवाडी-सोमेश्वरनगर,ता.बारामती,जि.पुणे ४१२ ३०६